# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

**प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना**

**(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)**

दुरध्वनी क्रमांक (02482)-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

E-mail:- rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website:- www.jalna.nic.in , http://59.90.142.57/ddmajalna


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि-

दिनांक: १४/०४/२०२०.

**(ई-मेलने/टपालाने)**

आपत्ती प्राधान्य

**वाचा:** १. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५.

२. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०.

३. अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १४ मार्च २०२०.

४. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ च्या बाबतचे पत्र दिनांक १३ मार्च २०२०.

५. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना २०२०/प्रा.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १५ मार्च, २०२०.

६. या कार्यालयाचे मुदतवाढ आदेश जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक: १३/०४/२०२०.

## परिपत्रक

**विषय:- राज्यात करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत. गरजू व्यक्तींना अन्नधान्य, जेवणाचे वाटप करतांना फोटो/व्हिडीओ/चित्रीकरण करण्यास मनाई**

ज्याअर्थी, राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असुन स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात आली आहे. त्याअन्वये जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ६ अन्वये जिल्हयात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

देशभरात लॉकडाऊन झाल्यापासून अनेक दानशूर व्यक्ती पुढे येवून गरजूंना मदत करीत आहेत. मात्र ही मदत करतांना अनेकांनी त्याचे फोटो/व्हिडीओ/चित्रीकरण करुन सोशल मिडीयावर टाकले आहेत. यामुळे गोरगरीब/गरजू व्यक्तींची अवहेलना होत असल्याचे निदर्शनास येत असून यामूळे अशा व्यक्तींच्या स्वाभिमानास ठेच पोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. माझे असेही निदर्शनास आले आहे की, अन्नधान्य, जेवणाचे वाटप करतांना गर्दी होते त्यामुळे सामाजिक अंतर पाळले जात नसल्याने लॉकडाऊनचा मुख्य हेतू साध्य होत नाही.

सबब, ही बाब लक्षात घेऊन या परिपत्रकाद्वारे सर्व जिल्हावासियांना सूचित करण्यात येते की, कुणीही गरजू व्यक्तींना अन्नधान्य, जेवण व तत्सम मदत साहित्य देताना फोटो/व्हिडीओ/चित्रीकरण करुन सामाजिक माध्यमावर पाठवू नये. तसेच अशा गोरगरीब/गरजू व्यक्तींच्या स्वाभिमानास ठेच पोचणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी.

अशा प्रकारे गरजू व्यक्तींना अन्नधान्य, जेवण व तत्सम मदत साहित्य देताना फोटो/व्हिडीओ/चित्रीकरण करुन सामाजिक माध्यमावर टाकल्याचे निदर्शनास आल्यास साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये दिलेल्या तरतूदीनुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे समजण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची दक्षता घ्यावी.

जिल्हाधिकारी कार्यालय जालना सत्यमेव जयते

Raut

**(रविंद्र बिनवडे)** भा.प्र.से.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**

**जालना**

**प्रत-(आवश्यक कार्यवाहीस्तव)**

१) पोलीस अधिक्षक, जालना.

२) जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना व्यापक प्रसिध्दीस्तव.

**प्रतिलीपी:-**

१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव.

२) मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना माहितीस्तव.